# अल्पसंख्यांक मुलींच्या वसतिगृह प्रवेशाबाबत सुचना

संदर्भ:- शासन निर्णय अविवि—२००९/प्र. क्र.१५/का.८, मंत्रालय, मुंबई. दि.२ मार्च २०१०

अकोला जिल्हयातील अल्पसंख्यांक समाजातील मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याकरीता सच्चर समितीने केलेले शिफारशीनुसार शासनाने अल्पसंख्यांक समाजातील मुलींसाठी वसतीगृह योजना सुरू केली आहे. त्या अंतर्गत डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला परिसरामध्ये सुसज्ज इमारतीमध्ये हे वसतीगृह सुरू करण्यात आले आहे. या वसतीगृहात अल्पसंख्यांक मुलींना खालील आरक्षणानुसार प्रवेश देण्यात येणार आहे.

| अं. क्रं. | अल्पसंख्यांक समुदाय | आरक्षण |
|---|---|---|
| १ | मुस्लीम | ३५ |
| २ | बौध्द | २१ |
| ३ | ख्रिश्चन | ०६ |
| ४ | जैन | ०६ |
| ५ | शिख | ०१ |
| ६ | पारसी | ०१ |

त्या अनुषंगाने पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणा—या गरजु व पात्र मुलींकडुन वसतीगृह प्रवेशाकरीता आवेदनपत्र मागविण्यात येत आहेत.

स्दर आवेदनपत्राचा नमुना तसेच वसतीगृहात प्रवेशाबाबतच्या सुचनां डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला चे वेबसाईट ( **www.pdkv.ac.in** ) वर देण्यात आलेले आहेत.विद्यार्थ्यांनी वेबसाईट वरून आवेदन पत्राचा नमुना डाउनलोड करून त्यातील संपुर्ण माहीती भरून आवश्यक कागदपत्रासह अधिष्ठाता ( कृषिअभियांत्रिकी ), कृषि अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय, डॉ.पं.दे. कृं.वि.,अकोला येथे दि. २९.०८.२०१९ रोजी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत हस्तपोच अथवा पोस्टान पाठवावेत.पोष्टाने पाठविलेले अवेदनपत्र उशीरा मिळाल्यास गृहीत धरण्यात येणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी आवेदकाची राहील.

आदेशान्वये

अधिष्ठाता (कृषिअभियांत्रिकी)
डॉ.पं.दे.कृं.वि.,अकोला

# *अल्पसंख्यांक मुलींचे वसतिगृह*
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला

### विद्यार्थीनींकरीता वसतिगृह प्रवेशाबाबत अर्जाचा नमुना

येथे फोटो
चिकटवण्यात यावा

**प्रति,**
**वसतिगृह अधिक्षीका,**
**अल्पसंख्याक मुलींचे वसतिगृह**
**डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला**

महोदया,

मी आपल्या वसतिगृहात प्रवेश मिळवू इच्छिते, प्रवेश अर्जामध्ये दिलेला तपशील माझ्या माहितीनुसार दिला आहे. मला वसतिगृहात प्रवेश मिळाल्यानंतर मी सोबत जोडलेल्या वसतिगृह नियमावलीचे (शिस्त, वसतिगृह अभ्यासातील प्रगती इत्यादी) कसोशीने पालन करीन असे आश्वासन देते. प्रवेश पत्रिकेत दिलेली माहिती चुकीची असल्यास अगर गैरशिस्त वागणूक आढळून आल्यास मला केव्हाही वसतिगृहातून काढून टाकण्यात येईल याची मला जाणीव आहे.

आपली विश्वासु

दिनांकः

(अर्जदार विद्यार्थीनीची सही)

### **अर्जदाराने भरावयाची माहिती**

| | | |
|---|---|---|
| १ | विद्यार्थीनीचे पूर्ण नाव | |
| २ | विद्यार्थीनीचे वडिलांचे पूर्ण नाव | |
| ३ | विद्यार्थीनीची जन्मतारीख (अर्जाचे दिनांक वय वर्षे नमुद करावे)(वयोमर्यादा 16 ते 25 निश्चित करण्यात आलेली आहे. | |
| ४ | विद्यार्थीनीची जात प्रवर्ग/पोटजात | |
| ५ | महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी आहेत काय? (अधिवास प्रमाणपत्र जोडण्यात यावे) | |

| | | |
|---|---|---|
| ६ | सद्या राहत असलेल्या ठिकाणचा पत्ता | |
| ७ | कायमचा पत्ता | |
| | (अ) स्थानिक पालकांचा पत्ता व असल्यास दुरध्वनी क्रमांक व विद्यार्थ्याचे नाते | |
| | ब) विद्यार्थीनीने शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय अधिका–यांचे प्रकृती चांगली असल्याबाबत तसेच संसर्गजन्य रोग नसल्याचे प्रमाणपत्र सोबत जोडले आहे काय? | |
| ८ | अ) विद्यार्थीनीचे व पालकांचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न | |
| | ब) सक्षम अधिका–याचा उत्पन्नाचा दाखला जोडला आहे का? | |
| ९ | शिकत असलेल्या महाविद्यालयाचे नाव व संपूर्ण पत्ता | |
| १० | शिकत असलेला अभ्यासक्रम व अभ्यासक्रमाचे वर्ष (बोनाफाईड प्रमाणपत्र जोडण्यात यावे) | |
| ११ | अ) सदर अभ्यासक्रमासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश झालेला आहे काय? | |
| | ब) असल्यास प्रमाणपत्र जोडलेले आहे काय? | |
| | क) सद्या शिकत असलेल्या महाविद्यालयात प्रवेशाचा दिनांक | |
| १२ | अ) अभ्यासक्रमास पात्रता प्रवेश परिक्षेच्या गुणावर प्रवेश मिळाला आहे काय? | |
| | ब) असल्यास पात्रता परिक्षेचे नाव व वर्ष | |
| | क) पात्रता प्रवेश परिक्षेत विद्यार्थ्यास मिळालेले गुण व पात्रता प्रवेश परिक्षेचे एकुण गुण | |
| १३ | कायमचा पत्ता व शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या महाविद्यालयामधील अंतर कि.मी. मध्ये | |

| | | |
|---|---|---|
| १४ | अ) विद्यार्थीनी स्वातंत्र सैनिकाची पाल्य आहे काय? | |
| | ब) असल्यास सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे | |
| १५ | अ) अपंग असल्यास अपंगत्वाचा प्रकार व टक्केवारी | |
| | ब) अपंग असल्यास सक्षम अधिकारी याचे प्रमाणपत्र जोडले आहे काय? | |
| १६ | अ) यापूर्वी अन्य वसतिगृहात प्रवेश मिळाला होता काय? | |
| | ब) असल्यास वसतिगृहाचे नाव व सदरील वसतिगृहे (शासकिय/अनुदानित/ विना अनुदानित) प्रवेशाचे वर्ष व अभ्यासक्रमाचे नांव नमूद करावे | |
| | क) यापूर्वी वसतिगृहामध्ये प्रवेशित असतांना सदर वसतिगृहातील वागणूकी संबधाने संबंधित वसतिगृहे वार्डन वा संबधित महाविद्यालयाचे प्राचार्य यांचे प्रमाणपत्र जोडले आहे काय? | |
| १७ | अ) मागील शैक्षणिक वर्षात वर्गात 75 टक्के उपस्थिती आहे काय? | |
| | ब) असल्याचे संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य अथवा संचालक यांचे प्रमाणपत्र जोडले आहे काय? | |
| १८ | अ) आधीच्या शैक्षणिक वर्षात दिलेल्या वार्षिक परिक्षेत मिळालेल्या गुणांची टक्केवारी (यासोबत मिळालेल्या विषयावर गुणांची सत्य प्रतिलीपी जोडावी) | |
| १९ | विद्यार्थीनी कोणती नोकरी करीत आहे काय असल्यास संस्थेचे नाव | |
| २० | वसतिगृहात प्रवेश मिळाल्यास नियमाप्रमाणे शुल्क भरण्यास सहमती आहे काय? | |
| २१ | वसतिगृहात खानावळीची सुविधा देय शुल्काची रक्कम भरण्यास सहमत आहे काय? | |

**विद्यार्थीनीची सही**

**१. अल्पसंख्याक वसतिगृहामध्ये प्रवेशासाठी पात्रता :-**

अ) सदर विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा. ***

आ) विद्यार्थ्यांचे व पालकाचे मिळून एकूण वार्षिक उत्पन्न रु.८.०० लक्ष मर्यादे पर्यंत असावे .

इ) शासनाने वेळोवेळी घोषित केल्याप्रमाणे व्यावसायिक अभ्यासक्रमां साठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीये व्दारे प्रवेश घेतलेले विद्यार्थी प्रवे शासाठी पात्र असतील.

ई) बिगर व्यावसायिक उच्च शिक्षण अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेले विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र असतील

टिप - व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वैद्यकीय शिक्षण, विधी, कृषी अशा विविध अभ्यासक्रमांचा समावेश होतो. याची यादी शासन निर्णय , उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकिर्ण - २०१७/प्र.क्र.३३२/तां शि - ४, दि.७ ऑक्टोबर, २०१७ सोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केलेली आहे.

*** महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थी म्हणजे ज्या विद्यार्थ्याचा राज्यात १५ वर्षे अधिवास असून, राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाची माध्यमिक आणि उच्च माध्यमिक परीक्षा उत्तीर्ण झालेला असावा.

*** अधिवासाच्या पुराव्यासाठी सक्षम प्राधिकरणाचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) जोडणे आवश्यक आहे .

**२. वसतिगृहामध्ये प्रवेश देतांना खालील प्राधान्यक्रम विचारात घेण्यात येईल.**

क) व्यावसायिक अभ्यासक्रमां साठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीये व्दारे आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील प्रवेश घेतलेले विद्यार्थी

ख) बिगर व्यावसायिक उच्च शिक्षण अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेले आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थी

ग) इयत्ता ११ वी व १२ वी वर्गांमध्ये शिक्षण घेत असलेले आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थी

**टिप - या योजने साठी आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गाकरीता रुपये८.०० लाख उत्पन्न मर्यादा निश्चित केली आहे**

३. अधिक दूरच्या ठिकाणाहून शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांस प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात यावे .

४. स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्यांना वसतिगृहामध्ये प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात यावे .

५. दिव्यांग आरक्षण : एकूण प्रवेशक्षमतेच्या ५% जागा दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी राखीव असतील.

६. उपरोक्त आरक्षित जागा, स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य, अपंग यांनी याबाबतची आवश्यक ती सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेली प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर करणे बंधनकारकआहे.

७. **वयोमर्यादा :-** वसतीगृहात प्रवेश घेण्यासाठी किमान वयोमर्यादा १६ व कमाल वयोमर्यादा २५ राहील. राज्य प्रशासकीय व्यवसाय मार्गदर्शन संस्था, मुंबई व सिडनहॅम व्यवस्थापकीय व संशोधन संस्था, मुंबई तसेच पी.एच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यींना वयाची अट लागू राहणार नाही.

८. **अर्जदार विद्यार्थ्यांनी अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे:-**

i) मागील वर्षाच्या गुणपत्रिकेची प्रत / चालू वर्षातील सामायिक प्रवेश परीक्षेच्या गुणपत्रिकेची प्रत

ii) महाराष्ट्र राज्याचा निवासी असल्याचा दाखला, (Domicile Certificate) .

iii) महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतल्याचा पुरावा.

iv) पालक नोकरी करीत असल्यास आयकर नमूना १६-अ चा फॉर्म .

v) आयकर पात्र पालकांच्या आयकर विवरणपत्राची( Income Tax Return ) प्रत.

vi) आयकर पात्र नसलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी तहसिलदार / सक्षम अधिकाऱ्यांनी स्वाक्षरी केलेल्या उत्पन्नाच्या दाखल्याची प्रत.

vii) शासकीय रुग्णालयातील डॉक्टरांकडून प्रकृती चांगली असल्याबाबत तसेच, संसर्गजन्य रोग नसल्याबाबत वैद्यकीय प्रमाणपत्र.

९. **इतर सर्वसाधारण नियम-**

i. प्रवेशासाठी अर्ज करताना अर्जात खोटी माहिती / कागदपत्रे सादर केल्याचे आढळून आल्यास सदर विद्यार्थ्याचा प्रवेश तात्काळ रद्द केला जाईल.

ii. प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांनी वसतिगृहात प्रवेश घेताना विहित करण्यात आलेले व देय असणारे शुल्क प्रत्येक सत्राच्या सुरुवातीस भरणे आवश्यक राहील.

iii. विद्यार्थ्यांनी खानावळीची सोय उपलब्ध असल्यास खानावळीचे प्रत्येक महिन्याचे आगाऊ मासिक शुल्क व्यवस्थापनाकडे जमा करावे .

iv. जर एक आठवड्यापेक्षा जास्त दिवस विद्यार्थ्यीस बाहेर जावयाचे असेल, तर जाण्यापूर्वी तीने व्यवस्थापन कार्यालयास लेखी कळविणे आवश्यक आहे. जर, विद्यार्थी समाधानकारक कारण न देता गैरहजर राहिली व वसतिगृहाचे नियम तोडण्याचा प्रयत्न केला तर वसतिगृह प्रमुख त्या विद्यार्थ्यास खोली रिकामी करण्यास सांगू शकेल.

v. वसतिगृह चालविणारी संस्था वसतिगृहातील कोणत्याही विद्यार्थ्यींचा गैरवर्तणूक शिस्तभंग या कारणास्तव वसतिगृहातील प्रवेश संबंधित महाविद्यालय / संस्थेचे प्राचार्य / संचालक यांच्या सहमतीने रद्द करु शकतील.

vi. वसतिगृहात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांने वसतिगृहाचे नियम पाळणे आवश्यक आहे व वसतिगृहातील विद्यार्थ्यींची एकूण वर्तणूक वसतिगृह प्रशासनाने वेळोवेळी विहित केलेल्या नियमानुसार असणे विद्यार्थ्यींवर बंधनकारक राहील.

vii. वसतिगृहात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी वसतिगृहात राहताना विहित केलेल्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. हे नियम सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहील. अन्यथा, त्यांच्याविरुध्द योग्य ती कारवाईकरण्याचे अधिकार विद्यापीठ प्रशासनास राहतील.

viii. प्रत्येक विद्यार्थ्यास महाविद्यालय / संस्थेच्या प्राचार्य / संचालकाकडून प्रत्येक सत्रात ७५ टक्के हजेरीबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. तसे नसल्यास याबाबतची सबळ कारणमिमांसा द्यावी लागेल.